अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि.२८ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १२२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## वॉशिंगटनची 'सुंदर' खेळी व्यर्थ, न्यूझीलंडचा २१ धावांनी विजय

सुराज्य/रांची

वॉशिंगटन सुंदरची अष्टपैलू खेळी व्यर्थ गेली आहे. आघाडीचे फलंदाजळ अपयशी ठरल्यामुळे टीम इंडियाचा पहिल्या टी २० सामन्यात २१ धावांनी पराभव झाला आहे. वॉशिंगटन सुंदर याने अर्धशतकासोबत दोन विकेट घेत अष्टपैलू खेळी केली होती. पण इतर फंलदाजांनी आपल्या लौकिकास साजेशी फलंदाजी न केल्यामुळे भारताला पराभवाचा सामना करावा लागला. तीन सामन्याच्या टी २० मालिकेत भारतीय संघ १-० ने पिछाडीवर आहे. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सेंटनर याने दोन विकेट घेतल्या. त्याशिवाय डॅरिल मिशेल आणि डेवेन कॉन्वे यांनी वादळी अर्थशतके झळकावलं.

न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात १%६ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडची सुरुवात वादळी झाली होती. फिन ॲलन आणि कॉन्वे यांनी सुरुवातीपासून भारतीय गोलंदाजांचा समाचार घेतला. ४ षटकात ४३ धावा चोपल्या होत्या. वॉशिंगटन सुंदर याने ही जोडी फोडत भारताला पहिलं यश मिळवून दिले होते. त्यानंतर मार्क चाम्पन यालाही सुंदरने स्वस्तात माघारी झाडले... तर कुलदीप यादव याने ग्लेन फिलीप्सला बाद केले..

लागोपाठ विकेट पडल्यामुळे न्यूझीलंडचा संघ अडचणीत सापडला होता. पण अखेरीस डॅरिल मिचेल याने ३० चेंडूत ५९ धावांची खेळी करत न्यूझीलंडला सन्माजनक धावसंख्या पर्यंत पोहचवलं. डॅरिल मिचेल आणि कॉन्वे यांनी अर्धशतकी खेळी केली. तर फिन ॲलने याने ३५ धावांची खेळी केली. भारताकडून वॉशिंगटन सुंदर याने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. तर अर्शदीप सिंह, कुलदीप यादव आणि शिवम मावी यांना प्रत्येकी एक एक विकेट मिळाली.

# ट्रकचा कट बसला क्षणार्धात बालकाच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला



## • जडवाहतूक थांबेना, अपघातांची मालिका संपेना

सुराज्य/सोलापूर

**गावापासून शहरात येईपर्यंत तो आजी-आजोबांच्या कुशीत होता. जोराचा वारासुध्दा लागू नये म्हणून आजी त्याला जपत होती. उन्हाचा चटका बसू नये म्हणून त्याचे डोके कापडाने झाकत होती. आजी स्वत:च्या जिवापेक्षा नातवाला जास्त जपत होती. काही मिनिटांत ते इच्छित स्थळी पोहचणारच होते. तितक्यात त्यांच्या मोटारसायकलला ट्रकने कट मारला आणि कुशीतील चिमुरडा खाली पडला. त्याच क्षणी ट्रकचे चाक त्याच्या डोक्यावरून गेले आणि क्षणार्धात डोक्याचा चेंदामेंदा झाला. रक्ताचा चिखल झाला. ज्याला स्वत:च्या जिवापेक्षा जास्त जपणाऱ्या आजी-आजोबांच्या डोळ्यादेखत त्याचा जागेवरच जीव गेला.**





ही आहे जडवाहतुकीमुळे सोलापूर शहरात होणाऱ्या अपघातांची मालिका. याच मालिकेतील हा अपघात शुक्रवारी दुपारी सव्वाएकच्या सुमारास घडला आहे अक्कलकोट रोड पाण्याच्या टाकीजवळील तानाबाना शोरूमसमोर. असद अल्ताफ बागवान (वय-३ वर्ष, रा. कर्जाळ,ता. अक्कलकोट) असे या अपघातात बळी पडलेल्या बालकाचे नाव आहे.

तो आजी मुमताज आणि आजोबा सरदार बाबू बागवान यांच्यासोबत सोलापूरला आला होता. आजोबा गाडी चालवत होते आणि असद आजींच्या मांडीवर बसला होता.

### कट बसला अन् जीव गेला

जेव्हा आजोबा सरदार यांची मोटारसायकल (एमएच १३/ बीएस ८३७७) तानाबाना शोरूमसमोर आली; तेव्हा त्यांच्याच पाठीमागून रेशनच्या गव्हाचा ट्रक (एमएच १३/ सीयू ०१९४) पाठीमागून आला. मोटारसायकल वळत असतानाच ट्रकचा मोटारसायकलला कट बसला. त्यामुळे आजी मोटारसायकलच्या डाव्या बाजूला पडली तर तिच्या मांडीवरील तीन वर्षांचा असद उजव्या बाजूला पडला. त्याचवेळी ट्रकचे पाठीमागील चाक त्याच्या डोक्यावरून गेले आणि डोक्याचा चेंदामेंदा झाला. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. आजोबा सरदार मोटारसायकलवरून उतरेपर्यंत असद रक्ताच्या थारोळ्यात पडला. जखमी आजी आणि आजोबा यांच्या डोळ्यात देखत असदचे डोळे मिटले आणि त्याने जागेवरच जीव सोडला.

### आजीची प्रकृती गंभीर, ट्रकचालकास अटक

दरम्यान, या अपघातात जखमी झालेली असदची आजी मुमताज बागवान यांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, जेलरोड पोलिसांनी अपघातग्रस्त ट्रक ताब्यात घेतला असून ट्रकचालक हणमंत अर्जुन राऊत(वय ४८, रा. भोसरे, ता. माढा) यास अटक करण्यात आली आहे.

### तीन दिवसांतील दुसरा बळी

गेल्या तीन दिवसांपूर्वी जुना पुना नाका परिसरात एका टिप्परची धडक बसल्यामुळे दहा वर्षांच्या मुलाचा जागेवरच मृत्यू झाला होता. या घटनेची चर्चा अद्याप शहरात सुरू आहे. तोपर्यंत शुक्रवारी दुसरी घटना घडली. रेशनच्या धान्याची वाहतूक करणाऱ्या ट्रकने असद या तीन वर्षांच्या बालकाचा जीव घेतला. गेल्या काही महिन्यांपासून शहरातून होणाऱ्या जड वाहतुकीमुळे वारंवार अपघात होत आहेत. शहरातून होणारी जड वाहतूकही थांबेना आणि जवडवाहतुकीमुळे होणाऱ्या अपघातांची मालिकाही संपेना, अशी सध्यस्थिती आहे.



## याची देही याचि डोळा पाहिला माऊलींच्या अश्वांचा रिंगण सोहळा

सोलापूर : माघवारी पालखी सोहळयातील माऊलींच्या अश्वाचे भव्य गोल रिंगण उत्साहात संपन्न झाले. श्री मार्कण्डेय मंदिर पंचकट्टा येथे दुपारी तीन वाजता वारकरी परंपरे प्रमाणे बंडोपंत कुलकर्णी (जिल्हाध्यक्ष), दत्तात्रय भोसले (शहर सचिव) यांचे माध्यमातून नित्यनेम पुर्ण करुन पार पडले

प्रारंभी ह.भ.प.भागवत महाराज चवरे पंढरपूर, मधुकर गायकवाड, तानाजी बेलेराव, नामदेव पुलगम या मान्यवरांच्या शुभ हस्ते संत ज्ञानेश्वर महाराज पालखी व संत तुकाराम महाराज पालखी पूजन करण्यात आले. त्यानंतर पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, किरण चीप्पा श्रीकांत ढगे, दगडू डोंगरे यांचे कडून रिंगणातील आश्वाचे पूजन करण्यात आले.

यावेळी अखिल भाविक वारकरी मंडळ पदाधिकारी जोतीराम चांगभले, बळिराम जांभळे, किसन कापसे, मोहन शेळके, संजय पवार, छाया खंडाळकर यांचे कडून ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला. तसेच रिंगण सोहळयाचे तप:पूर्ती वर्ष असल्यामुळ उमाकांत मिटकर, हभप विष्णु महाराज केंद्रे, सुदर्शन शिंदे सर यांचे हस्ते उपस्थित दिंडी प्रमुख व पालखी प्रमुख यांचा विशेष सन्मान करण्यात आला. रिंगण पूर्ण झाल्यानंतर पालखी सोहळा परंपरेने महादेव मंदिर, साठे चाळ या ठिकाणी येऊन आनंद चंदनशिवे , विजय चोरमुले यांचे हस्ते आरती होऊन नित्यनेमाचे कीर्तन श्री संत मुक्ताई प्रतिष्ठान यांचेकडून करून समारोप करण्यात आला.

सुधाकर महाराज डुंगळे यांचे मार्गदर्शनाने अखिल भाविक वारकरी मंडळ यांचे माध्यमातून माघवारी पालखी सोहळा व रिंगण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी कुमार गायकवाड सचिन गायकवाड, निवृत्ती मोरे, अभिमन्यु डोंगरे महाराज, संजय केसर, श्याम येदुर, निवृत्ती माने, पदाधिकारी परिश्रम घेतले.

## पॅरोलवर बाहेर आलेल्या आरोपीची पत्नीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

मोहोळ : जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला आणि पॅरोलवर बाहेर आलेल्या आरोपीने दुसऱ्या पत्नीच्या त्रासाला कंटाळून खुनेश्वर येथील शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी दि २७ रोजी उघडकिस आली आहे. या घटनेची नोंद मोहोळ पोलिस स्टेशनमध्ये झाली आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार मृत वैभव कालिदास मगर (४१ रा.खुनेश्वर ता. मोहोळ) याला पत्नीच्या खुनाच्या गुन्ह्यामध्ये जन्मठेप शिक्षा लागली होती. तो येरवडा जेलमध्ये शिक्षा भोगत होता. दि. १३ जानेवारी तो आपल्या गावी पॅरोलवर आला होता मात्र पॅरोल रजेवर असल्यामुळे त्याला एक दिवसाआड तामलवाडी (ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद) येथे पोलीस स्टेशन मध्ये हजेरी साठी जावे लागत होते.



२६ जानेवारी रोजी सकाळी ७ च्या सुमारास तो घरून हजेरी देण्यासाठी म्हणून गेल सायंकाळी साडेआठ वाजता त्याची आई निर्मला हिला मोबाईल वरून फोन करून जेवण बनवून ठेव असे सांगितले होत. परंतु तो रात्री उशिरा पर्यंत घरी आलाच नाही म्हणून त्याचा नातेवाईकांकडे सर्वांनी शोध घेतला असता तो आढळून आला नाही. २७ जानेवारी रोजी सकाळी आठच्या मृताची मामी सौ शैला या शेतातील देवाच्या पूजा करण्यासाठी गेल्या असता त्यांना गट नंबर २८१ मध्ये असलेला चिंचेच्या झाडाला वैभव याने नायलॉन दोरीने गळफास घेतल्याचे त्यांना दिसून आले. लागलीच त्यांनी आपले पती भिकाजी सोपान चव्हाण यांना याची माहिती दिली. त्यानुसार त्यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात खबर दिली असता घटनास्थळी पोलीस अधिकाऱ्यांनी जाऊन केलेल्या पाहणीत त्यांना मयताच्या कपड्याच्या तपासणीमध्ये एक चिठ्ठी आढळली आणि त्यामध्ये माझ्या मरणास माझी दुसरी पत्नी डॉक्टर प्रियंका सुरेश मोटे उर्फ प्रियांका वैभव मगर रा नरखेड हीच जबाबदार असल्याचे आणि तिच्या त्रासाला कंटाळून आपण आत्महत्या करीत आहे असे लिहिल्याचे आढळले आहे. याची खबर मृताचा मामा भिकाजी सोपान चव्हाण यांनी मोहोळ पोलीस स्टेशनमध्ये दिली असून पुढील घटनेचा अधिक तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

## सराईत गुन्हेगाराकडुन जबरी चोरी, घरफोडीसह चार गुन्हे उघड

सुराज्य/सोलापूर

शहरात चोरी, घरफोडी, जबरी चोरी, चाकू दाखवून लुटमार करणाऱ्या सराईत आंतरजिल्हा गुन्हेगाराला शहर गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अटक करून चार गुन्हे उघड केले. हरजितसिंग टाक (वय ४५, रा. सध्या लातूर) असे अटक करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे.

शहर परिसरात विविध प्रकारचे गंभीर गुन्हे घडत असताना शहर गुन्हे शाखेच्या पोलीसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा तपास सुरू केला असता त्यामध्ये हरजितसिंग टाक याने काही गुन्हे केल्याचे उघड झाले त्याला अटक करून त्याच्याकडून जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन जबरी चोरींचे, एमआयडीसी आणि फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येकी एक चोरीचे गुन्हे त्याने त्याच्या इतर दोन साथीदारांच्या मदतीने केल्याचे कबुल केले. चोरीतील दोन मोटारसायकली व सोन्याच्या दागिन्यासह २ लाखाचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. ही कामगिरी शहर गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पार पाडली.

## आयुक्तांनी केली पालिका प्रशासनात खांदेपालट!

### ▸ सारिका आकुलवार यांच्याकडे बांधकाम परवाना तर प्रकाश दिवणजींची झोनला बदली

सोलापूर : महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी आज प्रशासनात खांदेपालट केली आहे. बांधकाम परवाना देण्याचे काम सतीश एकबोटे यांच्याकडुन काढुन घेत सारिका आकुलवार यांच्याकडे दिले आहे. महेश क्षीरसागर यांना विभागीय कार्यालयातुन नगररचना विभागात पाठवण्यात आले आहे. तसेच अवेक्षक प्रकाश दिवाणजी यांची विभागीय कार्यालयात बदली केली आहे.

महापालिका प्रशासनात खांदेपालट केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. सहाय्यक अभियंता सारिका अकुलवार यांना सहाय्यक संचालक नगररचना कार्यालयात बांधकाम परवाना विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. अकुलवार या विभागीय अधिकारी होत्या. अनेक वर्षे भुमी मालमत्ता विभाग प्रमुख हे पद सांभाळलेल्या अकुलवार यांची विभागीय कार्यालय क्रमांक सात कडे पाठवण्यात आले होते.

सहाय्यक अभियंता व्यंकटेश चौबे यांच्याकडे पुन्हा एकदा पाणीपुरवठा विभाग देण्यात आला आहे. सध्या ते विभागीय अधिकारी या पदावर विभागीय कार्यालय क्रमांक एक कडे होते. आता ते पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सांभाळतील. या विभागातील त्यांच्या अनुभवाचा फायदा घेण्याच्या उद्देशाने ही बदली आयुक्तांनी केली आहे. याच विभागातील सहाय्यक अभियंता नीलकंठ मठपती यांचा विभाग न बदलता वेगळी जबाबदारी देण्यात आली आहे. आता ते उद्भव,वॉटर ट्रान्समिशन व डब्लूटीपी संबंधित कामे करतील. काही वर्षे विभागीय अधिकारी म्हणून तर काही महिने अतिक्रमण विभागात त्यांनी काम केले आहे. सहाय्यक अभियंता तपन डंके सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागात होते. त्यांना आता नगर अभियंता विभागात पाठवण्यात आले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पहाटेच' गणित आता उलगडतय!!

कल्याण

279-89-568

मेन बाजार

248-40-668

## मंत्रिपद जाताच पाखरं उडाली अन् मी एकटाच राहिलो

सुराज्य/कोल्हापूर

**मी मंत्री झालो, त्यावेळी घरासमोर लोकांची इतकी गर्दी होत होती, की दोन किलोमीटर गाडीच्या रांगा होत्या, मंत्री झालो की पीए वाढवले, अधिकारी आले, लोकं कौतुक करू लागली. लोकं म्हणायची भाऊ तुमच्यासारखा मंत्री नाही, पण कौतुक माणसाला फसवत असतं, मंत्रिपद गेलं आणि भरलेल्या कणसातील दाणं संपल्यावर पाखरं उडून जातात, तशी पाखरं देखील उडून गेली आणि मी एकटाच राहिलो, एक पण कौतुक करणारा राहिला नाही, अशी व्यथा रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केली आहे.**

### माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केली व्यथा

कोल्हापूर जिल्ह्यातील कोतोली इथं आयोजित केलेल्या पत्रकार दिन आणि गुणगौरव कार्यक्रमात खोत बोलत होते. कौतुक हे तुमच्यासाठी आहे की पदासाठी हे ओळखायला पाहिजे, असा सल्ला देखील त्यांनी यावेळी सर्वांना दिला आहे. पुढे बोलताना सदाभाऊ खोत म्हणाले की, बातमी कशीही येऊ दे, आज वाईट बातमी आली, तर उद्या चांगलीपण येते, पण आपली बातमी आलीच पाहिजे. कारण बातमी आली तरच समाजाला कळेल हा गडी अजून जिवंत आहे. माणूस चर्चेतून संपला की त्याचं मूल्य संपतं. त्यामुळे माणूस हा नेहमी चर्चेत असला पाहिजे. मला अनेक जण विचारतात तुम्ही राजू शेट्टींवर का बोलता? पण मी त्यांना सांगतो, राजू शेट्टींवर बोललो नाही तर चर्चाच होत नाही. मी बोललो तर राजू शेट्टीही बोलतात. त्यामुळे पुढील दोन तीन दिवस दोघे जण चर्चेत राहतो, असं खोत मिश्कीलपणे म्हणाले.

मंत्री असताना किती चौकशी समित्या नेमल्या मलाच माहिती नाहीत. मी मंत्री असताना अधिवेशन काळात पहाटे चार वाजेपर्यंत अभ्यास करायचो आणि सभागृहात पूर्ण तयारीने जायचो, पण प्रश्न उत्तर सुरू झाले की कागदच सापडत नव्हते, तेव्हा मी एकनाथ खडसेंचा सल्ला घेतला. त्यावेळी त्यांनी सभागृहात बसून राहावं आणि एखादा प्रश्न आला की म्हणायचं सन्माननीय सदस्य निश्चित याला न्याय मिळाला पाहिजे. चौकशी करू, समिती नेमू आणि दोषींवर कारवाई करू, असे म्हणायचे, यानंतरही पुन्हा प्रश्न विचारला तर चौकशी समिती नेमली जाईल, असं म्हणायचं आणि त्याप्रमाणे मी म्हणू लागलो.



पण आजपर्यंत किती चौकशी समित्या नेमल्या आणि कुणाला नेमल्या हे मलाच पत्ता नाही .मात्र या सल्ल्यानंतर मी सभागृहात अभ्यास करायचा बंद केला. मधल्या वाटेने पळून जाता येतं हे मला कळालं, पण एकनाथ शिंदे यांच्यासारखे नाही, असे सदाभाऊ खोत यावेळी भाषणात म्हणाले आहेत.